प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १३.११.२०१९**

# सिडकोच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त नवी मुंबईची जुनी छायाचित्रे पाठविण्याचे सिडकोचे आवाहन

सिडको महामंडळाचे सन २०१९-२० सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सिडकोतर्फे दिनदर्शिका, कॉफी टेबल बुक, माहिती पुस्तिका (ब्रोशर) यांचे प्रकाशन, नवी मुंबईच्या जुन्या छायाचित्रांचे प्रदर्शन इ. विविध उपक्रम वर्षभर राबविण्यात येणार आहेत. याकरिता नवी मुंबईतील जुने रहिवासी, विविध संस्था, पत्रकार, छायाचित्रकार यांनी त्यांच्या संग्रही असलेली नवी मुंबईची जुनी छायाचित्रे सिडकोला पाठविण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे.

मुंबईला पर्यायी शहर म्हणून नवी मुंबई विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे १७ मार्च, १९७० रोजी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ अर्थात सिडकोची स्थापना करण्यात आली. ठाणे आणि रायगड जिल्ह्यांतील ठाणे, पनवेल व उरण तालुक्यांतील ९५ गावांतील ३४४ चौ.कि.मी. क्षेत्रफळाची जमीन संपादित करून नवी मुंबईची उभारणी करण्यात आली. नवीन शहर हे सर्व प्रकारच्या पायाभूत, नागरी, सामाजिक आणि सांस्कृतिक सुविधांनी परिपूर्ण असेल, या दृष्टीने सिडकोने नवी मुंबईचे नियोजन केले. आपल्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीत सिडकोने नगर विकास क्षेत्रात आदर्श ठरतील असे अनेक प्रकल्प राबविले. तर वर्तमानात सिडकोतर्फे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना), मेट्रो, नेरूळ-उरण उपनगरी रेल्वे, कॉर्पोरेट पार्क यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

सिडकोच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त नवी मुंबईच्या विकासातील विविध टप्पे दर्शविणाऱ्या जुन्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्याचा सिडकोचा मानस आहे. याकरिता मागच्या पन्नास वर्षांतील सिडकोचे परिवहन, गृहनिर्माण, पायाभूत सुविधा किंवा अन्य प्रकल्प, नवी मुंबईतील बस अथवा रेल्वे स्थानके, नवी मुंबई विकसित होण्यापूर्वीच्या काळातील या परिसरातील गावे, यांच्याशी संबंधित जुनी छायाचित्रे ६ वा मजला, जनसंपर्क विभाग कार्यालय, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४ या पत्त्यावर दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ पर्यंत पाठविण्यात यावीत. सदर छायाचित्रे ही वैयक्तिक अथवा कौटुंबिक स्वरूपाची नसावीत. प्राप्त झालेल्या छायाचित्रांपैकी निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात येईल. प्रदर्शनाकरिता छायाचित्रांची निवड करण्याचे अधिकार हे सर्वस्वी जनसंपर्क अधिकारी, सिडको यांना असतील. तसेच प्रदर्शनाकरिता निवडण्यात आलेल्या छायाचित्रांवर सिडकोचा हक्क राहिल. निवड

करण्यात आलेल्या छायाचित्रांच्या संग्राहकांचा योग्य तो सन्मान सिडकोतर्फे करण्यात येईल. या संदर्भात अधिक माहितीसाठी ६७९१८२४१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**